नियमित फौ. ख. क्र. ३६/२०१९
सरकार -वि.- सुरेश
नि.क्र. ३५.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

१. मला रमेश, सुरेश, अशोक व राजेंद्र हे चार भाऊ आहेत. माझ्या वडीलांच्या नावाने ११.५ एकर जमीन आहे. ती जमीन रमेश,अशोक व राजेंद्र यांना माझ्या वडीलांनी मृत्यू पत्रान्वये दिली होती. ती जमीन सन २०१७ मध्ये दिली होती. दोन एकर जमीन माझ्या वडीलांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुरेशला जमीन देण्यात आली नव्हती. मला गट क्र.१४१ मधील साडेचार एकर जमीन देण्यात आली होती, रमेशला अडीच एकर जमीन देण्यात आली होती व अशोकला पावने तीन एकर जमीन देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ मध्ये जनार्दन मेश्राम यांच्याकडून उज्वला हिने दोन एकर शेती विकत घेतली होती. हे मला माहीत नाही की, त्या शेतीचा गट क्रमांक काय आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व उज्वलाच्या शेतीमधून उमरेड चिमूर सिमेंटचा रस्ता गेलेला आहे. माझे शेत उमरेड चिमूर रस्त्यावर पश्चिमेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, उज्वलाचे शेत उमरेड चिमूर रस्त्यावर पूर्वेला आहे, साक्षीदार सांगतो उज्वलाच्या शेतीच्या आधी रमेश शिंदे याचे शेत आहे. हे मला माहीत नाही की, उमरेड चिमूर ८० फुटाचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, उज्वलाला तिच्या शेताची वाहीजूपी करायची असल्यास माझ्या शेतात जावे लागत नाही. माझ्या वडीलांनी करुन दिलेले मृत्यू पत्रान्वये मी सन २०१८ मध्ये फेरफार करण्याकरिता दिले होते. हे मला माहीत नाही की, त्या फेरफारला सुरेश शिंदे यांनी हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझा फेरफार झाला नव्हता. मृत्यू पत्रान्वये फेरफार झाला होता त्याची तारीख मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुरेश शिंदे यांनी माझ्या फेरफारला हरकत घेतल्यामुळे मी त्यांच्यावर चिडून होतो. मी पोलिसांना बयान देताना घटना ही दुपारी ३.०० ते ३.३० वा. दरम्यान आरोपी व माझ्या शेताच्या मधल्या रस्त्यावर घडली असे सांगितले होते. तसे माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलिसांना बयान देताना मी शेतावर पोहोचलो तेव्हा आरोपीला विचारले की, मला कशाला बोलाविले असे सांगितले होते. तसे माझ्या

बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझा फेरफाराला हरकत घेतल्यामुळे मी चिडून जाऊन माझ्या पत्नीच्या माध्यमातून खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्यात सांगितलेली कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्यावेळी शेतात जाऊन आरोपी व त्याच्या पत्नीला रॉडने मारहान केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पवन जगताप हा माझा साळा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी पवन जगताप व त्याच्यासोबत असलेल्या रज्ञाक नावाच्या व्यक्तीने आरोपी क्र.२ हिचा ब्लाऊज फाडला. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मारहाण केली व आरोपी क्र.२ हिचा ब्लाऊज फाडला याचा गुन्हा माझ्यावर येऊ नये म्हणून मी आरोपी विरुद्ध खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कुठलीही मारहाण केली नाही. आता मला नि.क्र.३७ वरील दाखल असलेल्या ७/१२ उताऱ्याची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली ती आरोपी क्र.२ च्या शेताची आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक ०५.०८.२०२५.